निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : २५२ वा.
रविवार :१६ नोव्हेंबर २०२५

मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे | E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247



## छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

हरित क्रांतीचे प्रणेते माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण आणि परिसर विकास कामाचे उद्घाटन.

सिडको बसस्थानक जवळ, छत्रपती संभाजीनगर.
दुपारी - १.०० वाजता

छत्रपती संभाजीनगरच्या लौकिकात भर टाकणाऱ्या कमल तलावाचे लोकार्पण. केंद्र सरकार पुरस्कृत अमृत योजने अंतर्गत विकास काम.

क्रांती चौक, छत्रपती संभाजीनगर.
दुपारी - १.३० वाजता (ऑनलाइन)

मराठवाडा मुक्तिसंग्रामातील स्वातंत्र्य सेनानी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या अर्ध पुतळ्याचे अनावरण

क्रांती चौक, छत्रपती संभाजीनगर.
दुपारी - १.३० वाजता



शुभहस्ते •

### मा.ना.श्री. देवेंद्र फडणवीस

मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



रविवार
दिनांक १६/११/२०२५ रोजी

### छत्रपती संभाजीनगरच्या लौकिकात भर टाकणारा दिवस !

यांच्या सन्माननीय उपस्थितीत

**कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी**

**मा.ना.श्री एकनाथ शिंदे**
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

**मा.ना.श्री. अजित पवार**
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

**मा.ना.श्री. अतुल सावे**
मंत्री, इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक उर्जा, दिव्यांग कल्याण विभाग

**कार्यक्रमाचे अध्यक्ष**

**मा.ना.श्री संजय शिरसाट**
मंत्री, सामाजिक न्याय महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, छत्रपती संभाजीनगर

**विशेष उपस्थिती**

**मा. ना. श्री. इंद्रनील नाईक**
राज्यमंत्री, उद्योग, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), उच्च व तंत्र शिक्षण, आदिवासी विकास, पर्यटन, मृद व जलसंधारण

**मा. श्री. विक्रम काळे**
विधानपरिषद सदस्य तथा मुख्य प्रतोद (मंत्री दर्जा)

**मा. श्री रमेश बोरनारे**
विधानसभा सदस्य तथा मुख्य प्रतोद (मंत्री दर्जा)

**मा.डॉ. भागवत कराड**
राज्यसभा सदस्य छत्रपती संभाजीनगर

**मा. श्री. संदीपान भुमरे**
लोकसभा सदस्य, छत्रपती संभाजीनगर

**मा.डॉ. कल्याण काळे**
लोकसभा सदस्य, जालना

**मा. श्री सतीश चव्हाण**
विधानपरिषद सदस्य, छत्रपती संभाजीनगर

**मा.श्री. संजय केणेकर**
विधानपरिषद सदस्य, छत्रपती संभाजीनगर

**मा. श्री. प्रदीप जैस्वाल**
विधानसभा सदस्य- मध्य, छत्रपती संभाजीनगर

**मा. सौ. अनुराधा चव्हाण**
विधानसभा सदस्य फुलंब्री, छत्रपती संभाजीनगर

**मा.श्री. जितेंद्र पापळकर** (भा. प्र.से )
(विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर)

**मा.श्री. दिलीप स्वामी** (भा. प्र.से )
(जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर)

**मा. श्री. सुधीर हिरेमठ (भा.पो.से.)**
( पोलिस आयुक्त, छत्रपती संभाजीनगर)

**आणि**

**मा.श्री.जी. श्रीकांत (भा.प्र.से.)**
आयुक्त तथा प्रशासक, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर

**रणजीत पाटील**
अतिरिक्त आयुक्त-1.
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

**कल्पिता पिंपळे**
अतिरिक्त आयुक्त-2.
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

**फारुख खान**
शहर अभियंता
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

**बाळासाहेब शिरसाट**
कार्यकारी अभियंता इमारती,
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

शिल्पकार
**श्री. बलराज मडीलगेकर**

कंत्राटदार
**बालाजी सिव्हिल इंडस्ट्रीज,**
छत्रपती संभाजीनगर

## करीता आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

# सिंगल युज प्लास्टिकचा मोठा धोका

एकदाच वापरून टाकून देण्यात येणाऱ्या *सिंगल युज प्लास्टिक*चा वापर दिवसेंदिवस वाढत चालला आहे. प्लास्टिकचे कप, पिशव्या, पॉलिथिन, स्ट्रॉ, प्लास्टिकच्या बाटल्या, प्लेट्स, पॅकिंग साहित्य, ग्लास, पत्रावळ्या अशा अनेक वस्तू यामध्ये मोडतात. सहज उपलब्धता आणि कमी खर्च यामुळे सर्वसामान्यांमध्ये याचा वापर प्रचंड प्रमाणात वाढला आहे. भारतात दरवर्षी लाखो टन सिंगल युज प्लास्टिकचा वापर केला जातो आणि हा आकडा भविष्यात आणखी वाढण्याची शक्यता आहे.

**पर्यावरणावरील गंभीर परिणाम**

सिंगल युज प्लास्टिक बायोडिग्रेडेबल नसल्याने सहज नष्ट होत नाही. हे प्लास्टिक जाळल्यास विषारी वायू निर्माण होतो, ज्यामुळे वायु प्रदूषण वाढते. जमिनीत पुरल्यास ते वर्षानुवर्षे विघटन न होता पाण्याच्या स्रोतांना अडथळा निर्माण करते.नदी, विहीर किंवा तलावात टाकलेले प्लास्टिक जलप्रदूषण वाढवते. नदीमार्गे ते समुद्रात पोहोचल्यावर सागरी जीवांच्या आरोग्यास गंभीर धोका निर्माण होतो. प्लास्टिकचे सूक्ष्म कण त्यांच्या पोटात गेल्याने अनेक जलचरांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. प्लास्टिक गोठ्यांजवळ फेकल्यास गुरे ते खातात, ज्यामुळे त्यांना जीवघेण्या आरोग्य समस्या उद्भवतात.

**जैवविविधतेचा होणारा नाश**

सिंगल युज प्लास्टिकमुळे मानव, पशू-पक्षी, जलचर तसेच संपूर्ण जैवविविधता धोक्यात आली आहे. पाणी, हवा आणि जमीन या तिन्ही घटकांमध्ये प्रदूषण वाढवणारे हे प्लास्टिक पर्यावरणासाठी गंभीर आव्हान बनले आहे.

**नियंत्रणासाठी सरकारी उपाय**

या धोक्याची जाणीव ठेवून सरकार सिंगल युज प्लास्टिकवर **टप्प्याटप्प्याने निर्बंध** लादत आहे. मात्र केवळ निर्बंधांनी हा प्रश्न सुटणार नाही.

यासाठी नागरिकांमध्ये जनजागृती करणे अत्यावश्यक आहे.

- शाळा-कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन
- प्लास्टिक कचरा व्यवस्थापनाबाबत प्रशिक्षण
- पर्यावरणपूरक पर्यायांचा प्रसार
- प्रदूषणाचे दुष्परिणाम लोकांपर्यंत पोहोचवणे

ही पावले सरकार आणि समाजाने मिळून उचलायला हवीत.

सरकार निर्बंध लावत असले तरीही सिंगल युज प्लास्टिकचा वापर कमी होताना दिसत नाही.

त्यामुळे अंतिम आणि प्रभावी उपाय म्हणजे नागरिकांनीच याचा वापर कमी करणे किंवा पूर्णपणे बंद करणे.

पर्यावरणाचे रक्षण, मानवाचे आरोग्य आणि जैवविविधतेचे अस्तित्व टिकवण्यासाठी सिंगल युज प्लास्टिकपासून दूर राहणे हा भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचा मार्ग आहे.

## माजलगाव नगरपरिषद निवडणूक २०२५ : भव्य रांगोळी स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**आत्ताच एक्सप्रेस**

**माजलगाव/प्रतिनिधी/शेख हमीद**/माजलगाव नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर एन.यू.एल.एम विभाग, नगरपरिषद माजलगाव आणि स्वीप कार्यक्रम यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांच्या बचत गटांतर्गत भव्य रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. ही स्पर्धा दिनांक १४ नोव्हेंबर २०२५ रोजी विठ्ठल-रुक्मिणी मंदिर, फुलेनगर येथे पार पडली.

या उपक्रमाचे मार्गदर्शन निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी पोपट निगळ आणि नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सुंदर बोंदर यांनी केले. स्पर्धेत असंख्य महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

कार्यक्रम स्थळी मुख्याधिकारी बोंदर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी साळुंखे,श्रीमती बिघोत मॅडम,




श्रीमती शर्मिला सोळंके तसेच तेजश्री महिला शहर स्तर संघ माजलगाव यांच्या प्रतिनिधींनी उपस्थित महिलांना मतदान जनजागृतीसंदर्भात मार्गदर्शन केले.

स्पर्धेचे परीक्षण डॉ. प्रज्ञा जोशी, सुप्रिया मालानी,आकांक्षा बिघोत,मिनाक्षी बामणकर आणि स्वच्छता विभाग प्रमुख यांनी केले.हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी कमलाकर लांब (सहाय्यक प्रकल्प अधिकारी, एन.यू.एल.एम), अनिल चौधरी (समुदाय संघटक),सौ. छाया कुलकर्णी (व्यवस्थापक), सौ. भाग्यश्री देशमुख, सौ. अनुजा देशमुख, पूजा बाबर (सीआरपी)यांनी विशेष परिश्रम घेतले.

## सहिष्णुता : मानवतेला एकत्र ठेवणारे जीवनमूल्य

मानवी समाजाचा विकास हा केवळ भौतिक प्रगतीवर अवलंबून नसतो; त्यामागे काही मूलभूत मूल्यांची भक्कम पायाभरणी असते. या मूल्यांपैकी सर्वात महत्त्वाचे मूल्य म्हणजे सहिष्णुता होय. १६ नोव्हेंबर रोजी जगभरात साजरा केला जाणारा 'आंतरराष्ट्रीय सहिष्णुता दिन' हा विविधतेचा सन्मान करणाऱ्या मानवतावादी दृष्टीकोनाला अधोरेखित करणारा दिवस आहे. सहिष्णुता म्हणजे केवळ एकमेकांना सहन करण्याची वृत्ती नाही; तर भिन्न मत, संस्कृती, परंपरा, श्रद्धा आणि जीवनशैलींची सकारात्मक जाण करून घेणे, त्यांचा सन्मान राखणे आणि परस्पर संवादाच्या माध्यमातून समाजातील ऐक्य मजबूत करणे ही प्रक्रिया आहे. समाजशास्त्राच्या दृष्टीने सहिष्णुता ही सामाजिक स्थैर्याची, लोकशाहीची आणि शांततामय सह-अस्तित्वाची सर्वात मोठी हमी आहे. मानवजातीचे भवितव्य सुरक्षित ठेवण्यासाठी सहिष्णुता ही केवळ आवश्यकता नसून, ती मानवतेचा मूलाधार आहे.

जग विविधतेने परिपूर्ण आहे. प्रत्येक प्रदेश, समाज, समूह आणि संस्कृतीची स्वतःची वेगळी ओळख आहे. इतिहास, भाषा, धर्म, वंश, भूगोल आणि आर्थिक परिस्थिती यामुळे मानवी जीवनशैलीत मोठी भिन्नता दिसते. या भिन्नतेला आपण विविधता म्हणतो. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून ही विविधता समाजासाठी एक संपत्ती असते, कारण ती नवनवीन विचारांचे, ज्ञानाचे, मूल्यांचे आणि सामाजिक परिवर्तनांचे द्वार उघडते. तथापि, विविधता आणि सहिष्णुता या एकमेकांशी निगडीत संकल्पना आहेत. विविधतेला स्वीकारण्यासाठी सहिष्णुता हा आधारभूत गुण आवश्यक आहे. ज्या समाजांत विविधतेविषयी अविश्वास, भीती किंवा तिरस्कार आढळतो, ते समाज संघर्ष, अस्थिरता आणि विघटनाच्या दिशेने झुकतात. म्हणूनच सहिष्णुतेचे अस्तित्व कोणत्याही बहुविध समाजासाठी जीवनावश्यक ठरते.आजच्या काळात तंत्रज्ञानामुळे लोक एकमेकांच्या जवळ आले तरी मनांच्या दऱ्या मात्र वाढताना दिसतात. सोशल मीडिया आणि डिजिटल माध्यमे विचारस्वातंत्र्याला वाट मुक्त करतात, परंतु त्याचबरोबर चुकीच्या माहितीचे, कट्टरतेचे आणि ध्रुवीकरणाचे प्रभावही वाढवतात. समाजशास्त्रीय भाषेत याला 'इको चेंबर' म्हणतात. ज्यात व्यक्ती आपल्या मतांशी जुळणारीच माहिती पाहते आणि भिन्न मतांबद्दल असहिष्णुता वाढते. अशा मानसिकतेमुळे समाजातील विविध गटांमध्ये 'आपण विरुद्ध ते' असा भाव तीव्र होतो. त्यामुळे सहिष्णुता ही आजच्या माहिती-युगात अधिकच महत्त्वाची ठरते. एखाद्याचे मत, श्रद्धा किंवा विचार आपल्या मतांपेक्षा भिन्न आहेत म्हणून ते चुकीचेच असतात असे मानणे म्हणजे सामाजिक बंध अधिकच नाजूक करणे होय. त्यामुळे सहिष्णुता ही जागतिक शांततेची आणि सामाजिक सौहार्दाची सर्वात मोठी गुरुकिल्ली ठरते.

भारतीय समाजाच्या संदर्भात सहिष्णुतेचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. भारत हा जगातील सर्वात बहुरंगी आणि सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध देश आहे. धर्म, भाषा, जात, उपजाती, ग्रामीण-शहरी फरक, वेशभूषा, खाद्यसंस्कृती, परंपरा या सर्व स्तरांवर भारतात असामान्य विविधता दिसते. ही विविधता भारतीय समाजाची ताकद आहे आणि तिचे अस्तित्व टिकवून ठेवण्याची गुरुकिल्ली म्हणजे सहिष्णुता होय. भारताचा इतिहास पाहिला तर येथे अनेक राजवटी, अनेक संस्कृती, अनेक श्रद्धा आणि अनेक परकीय प्रभाव आले, परंतु भारताने या सर्वांना आत्मसात करून सामाजिक-सांस्कृतिक समृद्धी निर्माण केली. बौद्ध-अहिंसावाद, जैन धर्मातील करुणा, सूफी संतांचे प्रेमसूत्र, भक्ती चळवळीतील समता-विचार आणि आधुनिक भारताच्या संविधानातील धर्मनिरपेक्ष मूल्ये यामुळे भारतात सहिष्णुतेची भक्कम परंपरा तयार झाली आहे.

संविधानाने दिलेली स्वातंत्र्य, समानता, बंधुता ही मूल्ये सहिष्णुतेला संस्थात्मक रूप देतात. प्रत्येक व्यक्तीला धर्मस्वातंत्र्याचा, अभिव्यक्तीस्वातंत्र्याचा आणि जीवनपद्धतीचा अधिकार दिला आहे. कोणत्याही धर्म, जाती किंवा वर्गाविरुद्ध भेदभाव न करता समतेची पायाभरणी केली आहे. समाजशास्त्रीय दृष्टीने पाहता ही मूल्ये विविधतेला संरक्षण देतात आणि सहिष्णुतेच्या माध्यमातून समाजाला एकत्र बांधतात.सहिष्णुतेचे महत्त्व केवळ सामाजिकच नाही, तर आर्थिक आणि राजकीय क्षेत्रातही दिसून येते. सहिष्णु समाजांमध्ये आर्थिक प्रगतीचा वेग जास्त असतो, कारण भीती, असुरक्षितता आणि संघर्षातील ऊर्जा खर्च न होता लोक सर्जनशीलतेमध्ये, उत्पादनक्षमता वाढविण्यासाठी आणि नवोन्मेषासाठी कार्य करतात. राजकीय पातळीवर सहिष्णुता लोकशाहीला बळकटी देते. मतभिन्नता हा लोकशाहीचा आत्मा आहे.

**-डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(समाजशास्त्राचे अभ्यासक)**

## पत्रकारिता देश व समाज घडविण्याचे मोठे माध्यम

आज भारतातच नाही तर संपूर्ण जगात पत्रकारितेला मोठे महत्व आहे.त्यामुळे पत्रकारितेला चौथास्तंभ ही उपमा दिली आहे.जागतीक हालचाली, कळत-नकळत घटना,राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय, जिल्हास्तरीय, गल्लीपासून तर दिल्लीपर्यंत संपूर्ण हालचाली किंवा माहिती १४० कोटी जनतेपर्यंत पोहचवीण्याचे काम पत्रकारितेच्या किंवा सोशल मीडियाच्या माध्यमातून होत असते.१६ नोव्हेंबर १९६६ ला प्रेस काउन्सिल ऑफ इंडियाने राष्ट्रीय पत्रकारितेच्या निमित्ताने एक कार्यक्रम घेतला व यामध्ये ठरविण्यात आले की दरवर्षी १६ नोव्हेंबर हा दिवस राष्ट्रीय पत्रकारिता दिवस म्हणून साजरा करण्यात येईल.तेव्हापासुन प्रत्येक वर्षी १६ नोव्हेंबरला राष्ट्रीय पत्रकारिता दिवस म्हणून साजरा केल्या जातो.१९२० मध्ये लेखक वाल्टर लिपमैन आणि एक अमेरिकी दर्शनिक जॉन डेवी यांनी लोकतांत्रिक समाजामध्ये पत्रकारितेच्या भुमिकेवर विचार विमर्श प्रकाशित केले होते.पत्रकारिता,जनता आणि नितीनिर्माते यांच्यातील मध्यस्थीतीची भुमिका हाताळीत असते.तेव्हाच आपल्याला समतोलता दिसून येते.या समतोलतेचे दायीत्व पुर्णपणे पत्रकारितेवर अवलंबून असते व पत्रकार आपली जबाबदारी मोठ्या शिताफीने आणि खंबीरपणे पारपाडतो.प्रत्येकबाब जनतेच्या हितासाठी असावी या उद्देशाने प्रत्येक गोष्ट जनतेच्या हितार्थ प्रकाशित केल्या जाते.पत्रकारितेचे अनेक तत्व आहेत लिखाण, समाजातील घडामोडींवर नजर ठेवून माहीती एकत्र करने व ती पत्रकारितेच्या माध्यमातून समाजापर्यंत, सरकारपर्यंत व प्रशासनापर्यंत पोहचवीने.आजच्या आधुनिक युगात वर्तमानपत्र, रेडिओ, दूरदर्शन, वेब-पत्रकारिता, ई-पेपर,सोशल मिडिया यांच्या माध्यमातून पत्रकारितेची भुमिका मोठ्या प्रमाणात बजावली जाते.परंतु काही वाहीण्या स्वत:च्या स्वार्थासाठी कार्य करतात. यामुळे पत्रकारितेची बदनामी होतांना सुध्दा आपण उघड्या डोळ्यांनी पाहिले आहे.परंतु पत्रकारिता तीच असते ज्यामुळे समाजाची जडणघडण मजबूत होते व देशाचा पाया मजबूत होतो यालाच म्हणतात चौथास्तंभ.पत्रकारिता साधी शैली नसुन कोणत्याही घटनेचा लिखित रूपात वर्णन करण्याकरिता अनेक शैलींचा सटीकतेने उपयोग केल्या जातो यालाच म्हणतात पत्रकारितेची शैली. पत्रकारितेचे अनेक प्रकार आहेत एम्बुश पत्रकारिता, सेलिब्रिटी पत्रकारिता, कन्वर्जेस पत्रकारिता,गोंजो पत्रकारिता, खाजी पत्रकारिता, नवीन पत्रकारिता, विज्ञान पत्रकारिता, खेळ पत्रकारिता इत्यादी अनेक पत्रकारितेचे प्रकार आपल्याला पहायला मिळतात. पत्रकारांमध्ये नेहमी निष्पक्षता दिसून येते त्यामुळे समाजात खंबीरपणे उभे राहून आपल्या लेखणीच्या माध्यमातून धारधार लीखाण केल्या जाते.यातुनच समाजाला दीशा-निर्देश समजुन येतात. पत्रकारितेच्या लेखणीत एवढी धार असते की तलवारीची धार त्यासामोर नगण्य दिसून येते.कारण संपूर्ण समाजाच्या नैतिकतेची जबाबदारी पत्रकारांच्या लेखणीतून निर्माण होत असते.आज पत्रकारितेच्या माध्यमातून स्थल, जल,वायु यातील घडामोडी जनतेला कळुन येतात. आज मिडियाच्या माध्यमातून व वृत्तपत्र समूहाच्या माध्यमातून राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय घडामोडी सर्वांना पहायला मिळते.या घडामोडी समाजापर्यंत पोहचविण्याचे काम पत्रकारितेच्या माध्यमातून होत असते. ज्याप्रमाणे सुरंग खोदुन खनीज संपत्ती शोधल्या जाते.त्याचप्रमाणे पत्रकारिता व लेखक आपले विचार समाजापर्यंत पोहचविण्याकरिता एडीचोटीचे प्रयत्न करीत असतो म्हणजेच ऊन,पाऊस, थंडी, सुनामी,खडतडवाट, युद्धजन्य परिस्थितीतील ठिकाणांचा विचार न करता माहिती गोळा करतो व समाजापर्यंत पोहचवितो.तेव्हाच देशातील प्रत्येक व्यक्ती सकाळी वर्तमानपत्राची आतुरतेने वाट पाहत असतो. वर्तमानपत्राला सकाळचा नाश्ता सुध्दा म्हणतात. यावरून स्पष्ट होते की पत्रकारिता व लेखक यांच्यामुळे समाजाची जडणघडण होण्यास मोठी मदत मीळत असते. आज पत्रकारिता कोहीनुरच्या हीऱ्यापेक्षाही जास्त मौल्यवान आहे.आज एका लेखणीतून लाखो-अरबो शब्द बाहेर पडतात म्हणजेच पत्रकारिता ही समुद्रापेक्षाही अफाट आणि मौल्यवान असल्याचे दिसून येते. यातुनच जगात मोलाचा संदेश जात असतो.लेखणीमध्ये व पत्रकारितेमध्ये एवढे तालमेल आहे की संपूर्ण जग लेखणीच्या माध्यमातून पत्रकारितेवर मोठ्या प्रमाणात विश्र्वास ठेवतो.मराठी भाषेतील आद्य पत्रकार बाळशास्त्री गंगाधरशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी १८३२ रोजी दर्पण नावाचे पहिले मराठी दैनिक सुरू केले होते. १८३२ साली सुरू करण्यात आलेले बाळशास्त्री जांभेकरांचे दर्पण हे मराठीतील पहिले वृत्तपत्र होय.यानंतर राजा राममोहन रॉय यांचा संवाद कौमुदीटिळक-आगरकरांचा 'मराठा' व 'केसरी' गणेश शंकर विद्यार्थी यांचा 'प्रताप' ही सर्व वृत्तपत्रे आर्थीक तोटा सहन करून समाज जागृत करण्यासाठी चालविलेल्या जात होती.परंतु आता देशात काही राजकीय पक्षांची वृत्तपत्रेसुध्दा दिसून येतात हि वृत्तपत्रे व वृत्तवाहिन्या आणि दुर्दशन वाहीण्या पत्रकारितेला कलंकित करण्याचे काम करीत असतात.याला केंद्र व राज्य सरकारने कोठेतरी रोखले पाहिजे.आपल्या पुर्वजांनी ज्याप्रमाणे पत्रकारितेची जोपासना केली त्याचप्रमाणे पत्रकारितेची जोपासना सरकार मार्फत व प्रशासनामार्फत व्हायला पाहिजे आणि पत्रकारिता व चौथास्तंभ याला कोणताही आघात पोचनार नाही याची जबाबदारी राजकीय पुढाऱ्यांनी व सरकारने घेतली पाहिजे. टिआरपी वाढावी म्हणुन काही वाहीण्यांनी पत्रकारीतेची व चौथास्तंभ याची पायमल्ली करण्याचा प्रयत्न केला होता परंतु तो सरकारने हाणुन पाडला. १६ नोव्हेंबर राष्ट्रीय पत्रकारिता दिवसांच्या निमित्ताने हेच सांगु इच्छितो की पत्रकारिता व चौथास्तंभ याला कुठल्याही प्रकारची क्षती होणार नाही याची काळजी सर्वांनीच घेण्याची गरज आहे.देशात कुठल्याही परिस्थितीत पत्रकारितेचे व्यवसायीकरण होवु नये व राजकीय दृष्ट्या कोसो दूर राहुन पत्रकारिता आणखी बळकट केली पाहिजे. कारण पत्रकारिता ही प्रसारमाध्यमांचे काम करीत असते यातुनच समाजाला दीशा निर्देश मिळत असते. पत्रकारिता ही वटवृक्षासारखी अफाट आहे कारण समाजातील घटना ऊन,पाउस, थंडी यासारख्या बदलत असतात यापासून संरक्षण करण्याचे काम पत्रकारिता नेहमी करीत असते.

पत्रकार आपल्या जिवाची पर्वा न करता आकाश-पाताळ एक करून निर्भीडपणे कार्य करीत असतो.परंतु गेल्या काही वर्षांपासून असामाजिक तत्वांकडुन पत्रकारांवर हल्ले होत असतांनाचे दिसून येते ही अत्यंत गंभीर व निषेधजनक बाब आहे. अशा असामाजिक तत्वांना प्रशासनाने, केंद्र व राज्य सरकारांनी कोठेतरी रोखले पाहिजे व कठोर कारवाई केली पाहिजे. १६ नोव्हेंबर राष्ट्रीय पत्रकारिता दिवसाला शत-शत प्रणाम करतो.जय हिंद!

**-लेखक , रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**

## आडुळ तलाठी-मंडळाधिकारी कार्यालयासमोरून वाहतूक जोमात

**आत्ताच एक्सप्रेस**

**पैठण /प्रतिनिधी**/पैठण तालुक्यात गोदावरी नदीकाठावर वाळू तस्करांनी अक्षरशः धुमाकूळ घातला असून कोट्यवधी रुपयांची वाळू दिवसाढवळ्या चोरीला जात असल्याची धक्कादायक परिस्थिती निर्माण झाली आहे. महसूल व पोलिस यंत्रणेतील काही *'झारीतील शुक्राचार्य'* यामुळेच तस्करांचा दरारा वाढल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे.

**आडुळ परिसरातून वाळू उपसा जोमात; तलाठी-मंडळाधिकारी कोमात?**

महसूल विभाग आणि पोलिसांचे बोटचेपेणे लक्षात येत असल्याने तस्करांचे फावले आहे. प्रशासन कोमात गेल्याची भावना तर तस्कर जोमात असल्याची नाराजी नागरिकांनी व्यक्त केली आहे.

हा केवळ बोटचेपेणा आहे की त्यामागे शक्तिशाली आर्थिक साटेलोटे आहे, यावर तालुक्यात मोठ्या प्रमाणावर चर्चा रंगत आहे.

दरम्यान, तालुक्याच्या पूर्व भागातील अनेक गुन्ह्यांमध्ये नाव असलेला एक तलाठीच वाळू तस्करांचा 'म्होरक्या' म्हणून काम करत असल्याची खात्रीशीर माहिती समोर आली आहे.

**दिवसा ढवळ्या जेसीबी, ट्रॅक्टर, डंपरचा उच्छाद**

गोदावरी नदीपात्रात जेसीबी, ट्रक, डंपर आणि ट्रॅक्टरद्वारे खुलेआम वाळू उपसा सुरू आहे. सर्व यंत्रणा मॅनेज करून मोठ्या प्रमाणात वाळू चोरी होत असताना महसूल व पोलिस दल मात्र मौन बाळगून असल्याने नागरिकांमध्ये संताप पसरला आहे.

नदीची चाळण झाल्यासारखी अवस्था होत असून १० ते १५ फूट खोल खड्डे पडत आहेत. नदीकाठच्या विहिरी व पाणीस्रोत धोक्यात येण्याची स्थिती निर्माण झाली आहे.राजकीय पाठबळ असलेले, व्हाईट कॉलर गुन्हेगार प्रवृत्तीचे लोकही या रॅकेटमध्ये सक्रीय असल्याचे स्थानिक सांगतात.

**अधिकाऱ्यांवर हल्ले, वाहनांनी चिरडण्याचे प्रयत्न**

कारवाईसाठी गेलेल्या कोतवाल, तलाठी व मंडळाधिकाऱ्यांवर काही वेळा हल्ले झाले असून, वाहनांनी अंगावर घालून जिवे मारण्याचाही



प्रयत्न झाला आहे. या तस्करांविरोधात विविध पोलीस ठाण्यांत गुन्हे दाखल आहेत. यावरून वाळू तस्करी किती बोकाळली आहे हे स्पष्ट होते.

**वाळूच्या पैशातून तरुणाई गुंडगिरीकडे**

या अवैध वाळू व्यवसायातून मिळणाऱ्या पैशातून अनेक तरुण गुंडगिरीकडे वळत असल्याचा आरोप ग्रामस्थ करतात. तस्करांमधील अंतर्गत धुमसणारे वाद सार्वजनिक होत असून, महसूल विभागाला कोण टिप देणार यावरून भांडणे होण्याच्या घटना घडल्या आहेत.

**जिल्ह्याबाहेरही मोठ्या प्रमाणात वाळू पोहोच**

खालून वरपर्यंत सर्व यंत्रणा शक्कलीने मॅनेज करून तस्कर जिल्ह्याबाहेरही वाळू पोहोचवत आहेत. त्यामुळे गोदावरी नदी जणू 'लिलाव' केल्यासारखी परिस्थिती भासू लागली आहे.

ग्रामस्थांनी प्रश्न उपस्थित केला आहे-वाळू तस्करांकडून चालणाऱ्या मलिद्यात कोण-कोणांचा वाटा आहे?

## निवडणुका जाहीर होताच खुलताबादमध्ये राजकीय तापमान वाढले!

### चौथ्या दिवशी पाच उमेदवारी अर्ज दाखल - २ नगराध्यक्ष, ३ नगरसेवक पदांसाठी नामनिर्देशन

**आत्ताच एक्सयप्रेस**

**खुलताबाद/प्रतिनिधी**/खुलताबाद नगरपरिषद निवडणुका जाहीर होताच शहरातील राजकारण चांगलेच उसळले आहे. विविध पक्षांमध्ये प्रवेश सोहळ्यांची लगबग सुरू झाली असून तिकिटासाठी इच्छुकांची धावपळ शिगेला पोहोचली आहे. 'आयाराम-गयाराम'च्या हालचालींमुळे राजकीय चर्चांना यांच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारीची घोषणा झाल्यानंतर अनेक प्रभागांमध्ये संभाव्य उमेदवारांची नावे पुढे येऊ लागली आहेत. लवकरच प्रचाराचे नारळ फुटणार असल्याचे अकबर बेग यांनी सांगितले.

मात्र महाविकास आघाडी ही एकत्र लढणार की स्वतंत्र, याबाबत अद्याप निर्णय न झाल्याने इच्छुकांमध्ये संभ्रमाचे वाता- साधण्यासाठी अर्ज दाखल करण्यासाठी मोठी गर्दी झाली होती. मात्र वेळ अपुरा पडल्याने काहींना त्या दिवशी अर्ज दाखल करता आला नाही, अशी माहिती सूत्रांनी दिली.

नगरपरिषद निवडणुकांच्या चौथ्या दिवशी एकूण ५ उमेदवारी अर्ज दाखल झाले. यात नगराध्यक्ष पदासाठी - २ अर्ज,नगरसेवक पदासाठी - ३ अर्ज असा तपशील निवडणूक



अधिक वेग आला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) कडून माजी नगराध्यक्ष हाजी अकबर बेग

वरण कायम आहे. त्यामुळे काही ठिकाणी बंडखोरीची चिन्हेही दिसू लागल्याची चर्चा रंगू लागली आहे.दरम्यान, शुक्रवारी शुभमुहूर्त

निर्णय अधिकारी स्वरूप कंकाळ आणि सहाय्यक निर्णय अधिकारी समीर शेख यांनी दिला.

# ८५० किलो प्रतिबंधित प्लॅस्टिक जप्त

# मनपाच्या मित्र पथकाची कारवाई

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर /प्रतिनिधी/** छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या नागरी मित्र पथकाने शहरातील प्लॅस्टिक बंदीची प्रभावी अंमलबजावणी सुरू ठेवत आज पुन्हा एकदा मोठी कारवाई केली. या धडक मोहिमेत तब्बल ८५० किलो प्रतिबंधित प्लॅस्टिक जप्त करण्यात आले असून संबंधितांकडून दंडाची वसुलीही करण्यात आली आहे.

आज दुपारी गस्तीवर असलेल्या नागरी मित्र पथकाच्या कर्मचाऱ्यांना क्रांती चौक उड्डाण पुलाजवळ एम. एच. ४८ टी ९४७२ या क्रमांकाच्या महिंद्रा पिक-अप वाहनाबद्दल संशय आला. वाहनाची सखोल तपासणी केल्यावर त्यात प्रतिबंधित प्लॅस्टिकने भरलेल्या ३३ गोण्या आढळल्या. वजन केल्यावर या सर्व गोण्यांमध्ये मिळून ८५० किलो प्लॅस्टिक असल्याचे स्पष्ट झाले. महाराष्ट्र शासनाने घालून दिलेल्या नियमांनुसार अशा प्लॅस्टिकचा साठा, वाहतूक आणि वापर पूर्णतः बंदीस्त आहे.

नागरी मित्र पथकाने तत्काळ हे सर्व साहित्य जप्त करून वाहनचालक व संबंधितांकडून रु. १५,००० दंड वसूल केला. प्लॅस्टिक बंदीबाबत मनपा प्रशासनाने घेतलेला कडक पवित्रा आणि सातत्यपूर्ण तपासणी यामुळे शहरात प्रतिबंधित प्लॅस्टिकचा वापर लक्षणीयरीत्या कमी झाला असून अशा मोहीमा पुढेही सुरू राहणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

यापूर्वीच, काल जिन्सी पोलिसांच्या सहकार्याने नागरी मित्र पथकाने ४५० किलो प्रतिबंधित प्लॅस्टिक जप्त केले होते. सलग दोन दिवसांत जवळपास १,३०० किलो प्लॅस्टिक जप्त केल्यामुळे शहरात प्लॅस्टिक बंदीची अंमलबजावणी आणखी कडक होत



असल्याचे दिसून येते.

ही कारवाई आयुक्त तथा प्रशासक जी. श्रीकांत व उप आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन) नंदकिशोर भोंबे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. मोहिमेत नागरी मित्र पथक प्रमुख प्रमोद जाधव तसेच कर्मचारी आबाराव सोळुंके, रामराव सुरे, मोतीलाल बकले, अंजुम इनामदार आणि भुजंग यांनी विशेष परिश्रम घेतले.मनपा प्रशासनाने नागरिकांना प्लॅस्टिक बंदीचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन केले असून नियमांचे उल्लंघन केल्यास कठोर कारवाई करण्यात येणार असल्याची स्पष्ट चेतावणी दिली आहे.

---

## कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर

**यांचे कार्यालय**

**पदमपुरा परीसर, छत्रपती संभाजीनगर -४३१००५**

ई-मेल- aurangabad.eemahapwd.gov.in दुरध्वनी ०२४०-२३३१०२२

**सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय मंबई शासन शुध्दीपत्रक क्रमांक सीएटी / २०२४/प्र.क्र.१४४ / इमा- २ दिनांक - २८/०२/२०२४**

### ई निविदा सूचना क्रं. २८८ सन २०२५-२६

कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर ( दुरध्वनी क्रमांक. ०२४०-२३३११७४) महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम यांच्या कडुन (०५) कामाकरिता योग्य त्या वर्गातील नियमित नोंदनिकृत ठेकादाराकरिता बी-१ नमुन्यातील निविदा (ऑफलाईन / ऑनलाईन) प्रणालीव्दारे मागविण्यांत येत आहे.

खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१) http://mahapwd.gov.in
२) https://mahatenders.gov.in (सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यांत येईल)
३) कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालयातील सुचना फलक

**स्वाक्षरीत/-**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग ,छत्रपती संभाजीनगर**

**जिमाका / छ.स. न. जाहि / ४१६ । २०२५ २०२६**

---

## वैजापुरात नगराध्यक्षपदासाठी भाजपचे दशरथ बनकर यांचा अर्ज दाखल

वैजापूर/प्रतिनिधी /वैजापूर नगरपरिषदेच्या २ डिसेंबर रोजी होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या पाचव्या दिवशी (१४ नोव्हेंबर) सात प्रभागांतून एकूण १५ इच्छुकांनी आपले अर्ज दाखल केले. तर नगराध्यक्ष पदासाठी भाजपचे दशरथ बनकर यांनी अर्ज भरला. दशरथ बनकर व माधुरी बनकर या दांपत्याने प्रभाग क्र.११-अ मधून नगरसेवक पदासाठी स्वतंत्रपणे अर्ज भरले आहेत.

यामुळे आतापर्यंत नगरसेवक पदासाठी दाखल झालेल्या अर्जांची संख्या ३५वर पोहोचली आहे. तर नगराध्यक्ष पदासाठी शिवसेनेचे संजय बोरनारे आणि भाजपचे दशरथ बनकर अशी दोन अर्ज दाखल झाले आहेत.


---

# पाटेगाव परिसरात ऑनलाईन चक्री जुगाराचा सुळसुळाट; अनेकांचे संसार उद्ध्वस्त

**आत्ताच एक्सप्रेस**
**पैठण/ प्रतिनिधी / हारुन शेख/** पैठण पोलिस ठाणे हद्दीतील पाटेगावजवळ दादेगाव (ज) व शेवगावमार्गावर असलेल्या एका फिल्टर पाणी प्लांटच्या शेजारी मागील काही महिन्यांपासून ऑनलाईन चक्री जुगाराचा अड्डा मोठ्या प्रमाणावर खुलेआम सुरु असून, येथे दररोज लाखो रुपयांची उलाढाल केली जात असल्याची माहिती समोर आली आहे.

या जुगारामुळे अनेकांच्या सुखी संसाराची राखरांगोळी होत असून, नागरिकांमध्ये संतापाची लाट आहे.स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, गोरगरिब मजूर, कष्टकरी तसेच काही विद्यार्थी झटपट पैसे कमावण्याच्या आशेने या जुगाराच्या नादाला लागले आहेत. दिवसभर केलेली कष्टाची कमाई घरी घेऊन जाण्याऐवजी ती या चक्री जुगारात उधळली जात आहे.

या अड्ड्यावर पैठण शहरासह चांगतपुरी, दादेगाव, चणकवाडी, तेलवाडी, जायकवाडी, सोनवाडी व इतर गावांतील नागरिक मोठ्या



प्रमाणावर जात असल्याचे दिसून येत आहे. परिसराच्या सीमेवर असल्याने येथे पैठण व शेवगाव तालुक्यांतील तसेच अहिल्यनगर जिल्ह्यातील काही गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींचीही वर्दळ वाढल्याचे स्थानिकांनी सांगितले आहे. त्यामुळे परिसरातील शांतता व कायदा-सुव्यवस्था धोक्यात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

स्थानिक नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही पोलिसांकडून या अड्ड्याकडे जाणूनबुजून कानाडोळा केल्याचा आरोप करण्यात येत आहे. दिवस-रात्र खुलेआम सुरू असलेल्या या बेकायदेशीर जुगार अड्ड्यावर तात्काळ कारवाई करून तो बंद करण्याची मागणी स्थानिकांकडून जोर धरू लागली आहे.

---




# स्वातंत्र्य सेनानी बिरसा मुंडा जयंतीनिमित्त अभिवादन

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर /प्रतिनिधी/** छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वतीने आज आदिवासी समाजाचे प्रेरणास्थान, स्वातंत्र्य लढ्यातील धाडसी वीर बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

मनपा मुख्यालयात आयोजित कार्यक्रमात उप आयुक्त तथा विभागप्रमुख लखीचंद चव्हाण यांच्या हस्ते बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कृतज्ञतापूर्वक अभिवादन करण्यात आले.

या प्रसंगी माहिती व जनसंपर्क अधिकारी तौसीफ अहमद, रविंद्र खरात, अतुल बनकर, करण साळवे, इंझामाम उल हक यांसह इतर कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमात बिरसा मुंडा यांच्या क्रांतिकारी कार्याचा स्मरण करून त्यांच्या आदर्शांविषयी आणि समाजजागरणासाठी दिलेल्या अमूल्य योगदानाविषयी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी गौरवाच्या भावना व्यक्त केल्या. बिरसा मुंडा यांनी आदिवासी समाजासाठी उभारलेला संघर्ष, ब्रिटिश सत्तेविरुद्ध दाखवलेला निर्भय लढा आणि सामाजिक समानतेसाठी केलेले कार्य हे आजही देशाला प्रेरणा देणारे आहे.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वतीने या महान क्रांतीवीरास जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन.

---

# आश्रम शाळेत बालदिन व माजी विद्यार्थी संघ मेळावा उत्साहात साजरा

**आत्ताच एक्सप्रेस**
**सोयगाव / प्रतिनिधी /** आश्रम शाळा घाणेगाव तांडा प्रशालेत (दि. १४) नोव्हेंबर रोजी पंडित जवाहरलाल नेहरू जयंती बाल दिन म्हणून उत्साहात साजरी करण्यात आली , तसेच माजी विद्यार्थी संघ मेळावा घेण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक संजय पाटील होते तर प्रमुख पाहुणे प्राथमिकचे प्र .मुख्याध्यापक प्रवीण पवार माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष विनोद चव्हाण कोषाध्यक्ष संजय जटाळे सदस्य नितीन जैस्वाल ईश्वर चव्हाण अतुल इंगळे सागर चव्हाण होते.

सर्वप्रथम सरस्वतीचे पूजन करून पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते



हार अर्पण करण्यात आला. नंतर माजी विद्यार्थी संघातील मान्यवरांचा सत्कार प्रशालेच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला.

प्रसंगी विनोद चव्हाण ईश्वर चव्हाण संजय जटाळे यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनोज पाटील यांनी केले तर आभार प्रदर्शन सुनील कवीश्वर यांनी केले. कार्यक्रमास सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

---

# राजकीय समीकरणे बदलणार; बहूतांश कार्यकर्त्यांचा पक्षाच्या तिकिटावर भर

**आत्ताच एक्सप्रेस**
**कन्नड / प्रतिनिधी** /कन्नड तालुक्यातील पिशोर जिल्हा परिषद गट 'सर्वसाधारण' घोषित झाल्यानंतर संपूर्ण गटात राजकीय वातावरण तापले आहे. विविध पक्षांनी तयारीला वेग दिला असून कार्यकर्त्यांमध्ये उत्साह वाढलेला दिसतो. मात्र, बहुतांश कार्यकर्त्यांची उमेदवारी पक्षाच्या अधिकृत तिकिटावरच अवलंबून आहे, हे स्पष्टपणे जाणवत आहे.

परंपरेने रंगतदार स्पर्धा असलेला पिशोर गट

पिशोर गटात प्रत्येक निवडणुकीत चुरशीची आणि बहुरंगी स्पर्धा पाहायला मिळते. यंदाही विविध पक्ष आणि गटांनी स्थानिक नेत्यांच्या नेतृत्वाखाली रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे. नगरपरिषद व महानगरपालिकेच्या निवडणुकीनंतर या मोहिमेला आणखी उभारी मिळेल, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.



विविध पक्षांमध्ये उमेदवारांची चढाओढ

गट खुला होताच संभाव्य उमेदवारांनी आपली तयारी सुरू केली आहे.

पक्षनिहाय चर्चेत असलेली नावे -

शिंदे गट - राजू मास्तर मोकासे यांची उमेदवारी जवळपास निश्चित मानली जात आहे.

उबाठा गट - संजय आबा निकम यांचे नाव आघाडीवर.

स्थानिक राजकीय-सामाजिक क्षेत्र - देवपुळचे केतन भैय्या काजे यांचे पिशोर परिसरात चांगले वर्चस्व असून ते कोणत्या पक्षाकडून तिकीट घेणार याबाबत अद्याप स्पष्टता नाही.

भाजप - देवपुळ येथील गणेश घुगे यांना तिकीट मिळेल अशी चर्चा.नादरपुरचे संजय आबा निकम - उद्योग अनुभव, तरुणांमध्ये लोकप्रियता आणि नुकतेच संभाजीनगर येथे उद्धव ठाकरे गटात प्रवेश केल्यामुळे त्यांची उमेदवारी अधिक बळकट झाल्याचे बोलले जाते.याशिवाय काही नवीन चेहऱ्यांचीही शक्यता नाकारता येत नाही.

गावागावांत जनसंपर्काला वेग

गटातील गावांमध्ये इच्छुक उमेदवारांनी जनसंपर्काची सुरुवात केली आहे. सामाजिक कार्यक्रमांमध्ये उपस्थिती. मतदारांशी थेट संपर्क स्थानिक प्रश्नांवर चर्चा अशा माध्यमांतून आपली छाप उमेदवार उमटवत आहेत.काहींना पक्षांकडून तिकीट निश्चित मिळेल की नाही यावर अद्यापही अनिश्चितता आहे. त्यामुळे काही कार्यकर्ते स्वतंत्र उमेदवारीच्या पर्यायावरही विचार करत आहेत.

अधिकृत घोषणांनंतर अंतिम समीकरणे स्पष्ट आगामी काही दिवसांत पक्षांच्या अधिकृत उमेदवारांच्या नावांची घोषणा झाल्यानंतर पिशोर गटातील राजकीय समीकरणे अधिक स्पष्ट होतील. खुला गट झाल्याने सर्व पक्षांनी आपले लक्ष्य पिशोरवर केंद्रित केले आहे.जुने-नवे नेते, उत्साही तरुण कार्यकर्ते आणि बदलते मतदारविचार - या सर्वांमुळे पिशोर गटातील जिल्हा परिषद निवडणूक यंदा आणखी रंगतदार होणार आहे, असा राजकीय वर्तुळाचा अंदाज आहे.

---

# संपूर्ण मानवजात एकाच माता-पित्याची संतान आहे - इंजि. वाजेद कादरी

**आत्ताच एक्सप्रेस**
**फुलंब्री/ प्रतिनिधी/** फुलंब्री तालुक्यातील बोधेगाव येथील जामा ए अंजुम मस्जिद येथे शनिवारी (दि.१५) सकाळी दहा वाजता मस्जिद कमिटीच्या वतीने मस्जिद परिचय व सद्भावना संदेश या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. राष्ट्रीय एकात्मता, मानवीय एकता, बंधुता व समानतेचा संदेश देणाऱ्या या कार्यक्रमाला गावातील तसेच परिसरातील शेकडो सर्वधर्मीय बांधवांनी उत्स्फूर्त उपस्थिती दर्शवली.

कार्यक्रमात इंजिनिअर वाजेद कादरी यांनी कुराणातील सामाजिक ऐक्याच्या संदेशावर प्रकाश टाकत मार्गदर्शन केले.

त्यांनी सांगितले की, संपूर्ण मानवजात ही एकाच माता-पित्याची संतान आहे. आमच्या उपासना-पूजा पद्धती जरी वेगळ्या असल्या तरी सर्वश्रेष्ठ परमेश्वर - अल्लाह - एकच आहे.

मस्जिद म्हणजे काय? मस्जिदीत प्रार्थना



कशी केली जाते? मुस्लिम समाजाची उपासना पद्धती व शिस्त याबाबत त्यांनी सविस्तर माहिती दिली.

भारतात विविध धर्म, मत, संस्कृती असून सांप्रदायिक सौहार्द टिकून राहण्यासाठी परस्परांच्या धर्माची माहिती असणे आवश्यक असल्याचेही ते म्हणाले. समाजातील बंधुता, प्रेम, जातीय सलोखा व राष्ट्रीय एकात्मता बळकट करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

कार्यक्रमास शेख तस्लीमोद्दीन, वाजेद शहा, मो. फैसल, अब्दुल रहमान, माजी उपसरपंच बिस्मिल्ला पठाण, माजी सरपंच राजेंद्र वाघ, डॉ. किरण राजपूत, अंकुश कुंटे, मनोहर सोनवणे, राजू कुंटे, कैलास कुंटे, प्रशांत पाठक, नामदेव कुंटे, काकासाहेब ढेपले, चरणसिंग राजपूत, भानुदास वाघ यांसह सर्व धर्मीय नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच **फिरोज पठाण, इरफान शहा, आबेद अली, अहमद पठाण, शोएब पठाण, सरफराज खान, सोहेल खान, अमजद पठाण आदी मान्यवरांचीही उपस्थिती होती.

---

# विद्यार्थिनी जबीन सलीम खान सुकेडे हिने जिल्हास्तरीय शालेय कराटे स्पर्धेत उल्लेखनीय आणि प्रशंसनीय कामगिरी

आत्ताच एक्सप्रेस
सिल्लोड/प्रतिनीधी/ सिल्लोड शहरातील ऑक्सफर्ड इंग्लिश स्कूलची विद्यार्थिनी जबीन सलीम खान सुकेडे हिने १३ नोव्हेंबर २०२५ रोजी छत्रपती संभाजीराजांचा नगर येथे पार पडलेल्या जिल्हास्तरीय शालेय कराटे स्पर्धेत उल्लेखनीय आणि प्रशंसनीय कामगिरी करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. कठोर मेहनत, सातत्यपूर्ण सराव आणि खेळाप्रतीची निष्ठा यांच्या जोरावर तिने प्रतिस्पर्ध्यांना जोरदार टक्कर देत आपले कौशल्य सिद्ध केले.

स्पर्धेत जबीन हिने दाखवलेला संतुलित खेळ, अचूक तंत्र आणि आत्मविश्वासपूर्ण फाइटिंग स्टाईल याची उपस्थित सर्व मान्यवरांनी दखल घेतली. तिच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल जिल्हा क्रीडा अधिकारी तसेच स्पर्धा आयोजकांनी विशेष अभिनंदन करून तिला प्रोत्साहन दिले.

जबीन हिला कराटेचे प्रशिक्षण शेख एजाज सर यांनी दिले असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली तिने मागील काही महिन्यांपासून प्रखर मेहनत घेतली होती. शाळेतील सर्व शिक्षकांनी तिच्या यशाबद्दल समाधान व्यक्त केले आहे. ऑक्सफर्ड इंग्लिश स्कूलच्या व्यवस्थापनानेही तिच्या क्षमतेचे कौतुक करत भविष्यात राष्ट्रीय स्तरावरही उत्तुंग यश मिळवावे, अशी शुभेच्छा दिली.



तिच्या यशामुळे तिच्या आई-वडिलांचा, नातेवाईकांचा आणि मित्रपरिवाराचा अभिमान दुणावला आहे. एका सर्वसामान्य कुटुंबातील मुलीने चिकाटी, आत्मविश्वास आणि परिश्रमाच्या बळावर मिळवलेले हे यश निश्चितच प्रेरणादायी ठरले आहे. आगामी काळात जबीन कराटे क्षेत्रात आणखी उज्ज्वल कामगिरी करेल आणि सिल्लोड शहराचे नाव अधिक उंचावेल, अशी सर्वांकडून अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# न्यायालयांनी 'इमर्जन्सी वॉर्ड' प्रमाणे तत्पर व्हावे - न्यायमूर्ती सूर्यकांत

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना /प्रतिनिधी/** रुग्णालयातील आपत्कालीन कक्ष जसा जीव वाचवण्यासाठी क्षणाचाही विलंब करू शकत नाही, तसेच उच्च न्यायालयांनीही संकटाच्या क्षणी त्वरित, अचूक आणि समन्वित कार्यवाही करण्यास सदैव सज्ज राहिले पाहिजे, असे प्रतिपादन सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी झारखंड उच्च न्यायालयाच्या रौप्यमहोत्सवी कार्यक्रमात केले. त्यांच्या या प्रभावी भाषणाने प्रेरित होऊन नोटरी असोसिएशन जालना चे कार्याध्यक्ष महेश एस. धनावत यांनी महाराष्ट्रातील कनिष्ठ न्यायालयांमधील गंभीर समस्यांकडे लक्ष वेधत राज्याच्या विधी व न्याय मंत्र्यांना सविस्तर ई-मेल ठराव पाठवला आहे.

कनिष्ठ न्यायालयांची व्यथा : २००-२५० खटले दररोज, कर्मचाऱ्यांची टंचाई

धनावत यांनी नमूद केले की जिल्हा व तालुका न्यायालयांमध्ये एका दिवसात एका न्यायाधीशासमोर **२०० ते २५० प्रकरणे** येतात. न्यायालयीन कर्मचाऱ्यांची संख्या अत्यल्प असल्याने-

वॉरंटच्या अंमलबजावणीत पोलिस विभागाकडूनही मोठा विलंब होतो.

या दिरंगाईमुळे विशेषत: चेक बाऊन्स आणि व्यावसायिक वाद वर्षानुवर्षे प्रलंबित राहतात. आरोपींमध्ये कायद्याचा धाक कमी होत आहे, असेही त्यांनी नमूद केले.

जलद न्याय हा मूलभूत हक्क - सर्वोच्च न्यायालय

कलम २१ नुसार जलद न्यायदान हा प्रत्येक नागरिकाचा हक्क असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने अनेक ऐतिहासिक निर्णयांत अधोरेखित केले आहे-

हुसेनआरा खातून वि. बिहार सरकार (१९७९)

अनिल राय वि. बिहार सरकार (२००१)

विकसित देशांप्रमाणे वेगवान न्यायव्यवस्था ही सामाजिक व आर्थिक स्थैर्याची गुरुकिल्ली असल्याचे ड. धनावत यांनी निदर्शनास आणून दिले.

धनावत यांचे उपायसूत्र :

त्यांच्या निवेदनात पुढील ठोस मागण्या करण्यात आल्या आहेत-

१. समन्स-वॉरंट प्रक्रियेचे नियमित स्वतंत्र ऑडिट

२. न्यायालयीन कर्मचाऱ्यांसाठी प्रोत्साहन भत्ता (वेळेवर बजावणी केल्यास)

३. विनाकारण विलंब करणाऱ्यांवर ंडात्मक कारवाई

४. गृह विभागाच्या समन्वयाने जलद समन्स-वॉरंट यंत्रणा

५. पोलिस विभागाच्या कामकाजावर नियमित निरीक्षण

त्यांच्या मते, समन्स वेळेवर बजावले आणि खटले जलद गतीने चालले तर प्रलंबित प्रकरणे जवळपास शून्यावर येऊ शकतात, तसेच लोकअदालतीचे कामकाज अधिक प्रभावीपणे वाढू शकते.

# जालना महापालिका शाळांच्या शिक्षकांसाठी कौशल्य विकास प्रशिक्षणाचे आयुक्त आशिमा मित्तल यांच्या हस्ते उद्घाटन



**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना /प्रतिनिधी/** जालना शहर महानगरपालिकेमार्फत विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविणे आणि विद्यार्थी संख्येत वाढ घडवून आणणे या उद्देशाने शिक्षकांसाठी कौशल्य विकास प्रशिक्षण उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या उपक्रमातील पहिल्या प्रशिक्षण सत्राचे उद्घाटन जिल्हाधिकारी तथा महापालिका आयुक्त मा. आशिमा मित्तल यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले.

या प्रशिक्षणामध्ये शिक्षकांना अध्यापन पद्धती, विद्यार्थ्यांशी संवाद कौशल्य, वर्ग व्यवस्थापन,शैक्षणिक नवकल्पना या महत्त्वाच्या घटकांवर मार्गदर्शन करण्यात आले.

प्रशिक्षक म्हणून दीपक दराडे व श्रीमती राधा घुगे यांनी आपल्या व्यावहारिक अनुभवातून शिक्षकांना मौल्यवान मार्गदर्शन केले.महापालिकेच्या सर्व शाळांची शैक्षणिक पातळी उंचावण्यासाठी आणि विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्तावृद्धी साध्य करण्यासाठी अशा प्रकारची प्रशिक्षण सत्रे नियमित घेतली जाणार असल्याची माहिती मा. आयुक्त आशिमा मित्तल यांनी दिली.कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त अर्जुन गिराम, सहाय्यक आयुक्त केशव कानपुडे,शिक्षणाधिकारी यांसह विविध अधिकारी आणि शिक्षक उपस्थित होते.




# उपशिक्षणाधिकारीपदी पदोन्नती; संजय कायंदे यांचा शिक्षक पतसंस्थेतर्फे सत्कार

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना /प्रतिनिधी/** जालना व बदनापूर तालुका जिल्हा परिषद शिक्षक सहकारी पतसंस्था संचालक मंडळाच्यावतीने नवनियुक्त उपशिक्षणाधिकारी संजय कायंदे यांचा पदोन्नतीनिमित्त भाग्यनगर येथील संस्थेच्या कार्यालयात शुक्रवार, दि. १४ नोव्हेंबर रोजी सत्कार करण्यात आला.

सत्काराला उत्तर देताना कायंदे म्हणाले, या पतसंस्थेचा मी गेल्या २७ वर्षांपासून घटक आहे. संस्थेची प्रगती, तिची गरुडभरारी मी जवळून पाहिली आहे. जालना-बदनापूर तालुका शिक्षक पतसंस्थेचा मला अभिमान आहे. उपशिक्षणाधिकारी म्हणून कार्यरत असताना शैक्षणिक क्षेत्रात तसेच सहकार क्षेत्रात जे काही सहकार्य अपेक्षित असेल, ते पूर्ण मनोभावे देण्याचा प्रयत्न करीन, असे त्यांनी सांगितले. तसेच संस्थेने दिलेल्या सन्मानाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

कार्यक्रमास संस्थेचे चेअरमन जगत घुगे, व्हाइस चेअरमन सौ. साधना पुंजाजी गिऱ्हे, सचिव संतोष देशपांडे, खजिनदार अरुण जाधव, संचालक विकास पोथरे,रमेश हुशे जगन्नाथ शिंदे ुभाष भडांगे, गणेश भुतेकर, दिनेश एखंडे, रघुनाथ वाघमारे,सचिन गंगावणे, मधुकर काकड, देवेंद्र बारगजे, तज्ञ संचालक बबनराव बोरुडे, तसेच व्यवस्थापक ,ज्ञानेश्वर मराठे,शैलेश धोत्रे, अनिकेत कायंदे, हिमेश तोडकर आदी मान्यवर उपस्थित होते.

# घनसावंगी नगर पंचायतीचे नगरसेवक देवनाथ जाधव यांचा शिवसेनेत भव्य प्रवेश




**आताच एक्स्प्रेस**

**घनसावंगी /प्रतिनिधी /सोपान वाघमारे/** घनसावंगी तालुक्यातील ज्येष्ठ समाजाभिमुख नेते व घनसावंगी नगर पंचायतीचे स्वीकृत नगरसेवक देवनाथ जाधव यांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षात जाहीर प्रवेश करून स्थानिक राजकारणात नव्या समीकरणांना सुरुवात केली आहे.

दिनांक १२ नोव्हेंबर २०२५, बुधवार रोजी जालना येथे आयोजित करण्यात आलेल्या शिवसेना कार्यकर्ता महाळाव्यात देवनाथ जाधव यांनी शिवबंधन बांधून अधिकृत प्रवेश केला. कार्यकर्ता महाळाव्यात उपस्थित झालेल्या हजारो शिवसैनिकांच्या उपस्थितीत हा प्रवेश सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

या महत्त्वपूर्ण प्रसंगी शिवसेनेचे मुख्य नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री मा. एकनाथराव शिंदे यांनी देवनाथ जाधव यांचा सत्कार करून त्यांचे पक्षात स्वागत केले.

यावेळी जालना जिल्ह्यातील प्रभावी नेते मा. भास्करराव आंबेकर, आमदार अर्जुनराव खोतकर तसेच लोकप्रिय नेते हिकमतदादा ऊढण आदी मान्यवर उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी देवनाथ जाधव यांच्या कार्याची प्रशंसा करत शिवसेनेची ताकद स्थानिक पातळीवर अधिक वाढेल, असा विश्वास व्यक्त केला.

देवनाथ जाधव यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, घनसावंगी तालुक्याच्या विकासासाठी आणि स्थानिक नागरिकांच्या प्रश्नांवर ठोसपणे आवाज उठवण्यासाठी ते शिवसेनेच्या भूमिकेवर विश्वास ठेवतात. शिवसेना पक्षप्रमुखांच्या नेतृत्वाखाली तालुक्याच्या विकासाला नवे गतीमान मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. घनसावंगी परिसरात या प्रवेशाची जोरदार चर्चा असून, येत्या स्थानिक स्वराज्य निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या घडामोडी महत्त्वपूर्ण ठरत आहेत. स्थानिक स्तरावर अनेक कार्यकर्ते आणि नागरिकांनी जाधव यांच्या निर्णयाचे स्वागत केले असून, शिवसेनेची ताकद वाढण्यास याचा मोठा हातभार लागेल, असे म्हटले जात आहे.या प्रवेशामुळे घनसावंगी तालुक्यात शिवसेनेला नवे बळ मिळणार असून पुढील राजकीय घडामोडींना यामुळे नवे वळण मिळण्याची चिन्हे दिसत आहेत.

## अंबड नगर परिषद निवडणूक २०२५

# नामनिर्देशन दाखल प्रक्रिया सुरू; ८ अर्ज प्राप्त - आचारसंहितेच्या पालनाचे आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**अंबड /प्रतिनिधी /** अंबड नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ अंतर्गत नामनिर्देशन दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाली असून निवडणूक निर्णय अधिकारी व तहसीलदार विजय चव्हाण यांनी निवडणुक प्रक्रियेची माहिती दिली. शुक्रवार, दि. १५ नोव्हेंबर २०२५रोजी सायंकाळपर्यंत निर्णय अधिकारी कार्यालयात एकूण ८ नामनिर्देशन अर्ज दाखल झाले आहेत. यामध्ये अध्यक्षपदासाठी २ तर सदस्यपदासाठी ६ अर्जांचा समावेश आहे.

उमेदवारांची गैरसोय टाळण्यासाठी उद्या रविवार असूनही कार्यालयात नियमित वेळेत नामनिर्देशन स्वीकारले जाणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली. नामनिर्देशन दाखल करण्याची अंतिम मुदत सोमवार, १७ नोव्हेंबर २०२५, दुपारी ३ वाजेपर्यंत आहे. या कालावधीनंतर कोणताही अर्ज स्वीकारला जाणार नाही, असे स्पष्ट निर्देश श्री. चव्हाण यांनी दिले. शेवटच्या क्षणी होणारी गर्दी, कागदपत्रांतील त्रुटी आणि तांत्रिक अडचणी टाळण्यासाठी उमेदवारांनी आवश्यक सर्व कागदपत्रांसह वेळेपूर्वी अर्ज दाखल करण्याचे आवाहनही करण्यात आले.




निवडणुकीची घोषणा होताच अंबड नगर परिषद क्षेत्रात आचारसंहिता लागू झाली असून तिचे काटेकोर पालन सर्व पक्ष, उमेदवार, कार्यकर्ते व नागरिकांनी करणे बंधनकारक आहे. आचारसंहितेचा भंग झाल्यास संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, अशी कडक चेतावणी प्रशासनाने दिली आहे. प्रचाराची साधने, ध्वनिवर्धकांचा वापर, रॅली, सभा, जाहिरात फलक यांबाबतच्या निर्धारित नियमांचे पालन अनिवार्य असल्याचेही निवडणूक अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पडावी यासाठी प्रशासनाने सर्व आवश्यक सुविधा व यंत्रणा तयार ठेवली असून नामनिर्देशन पडताळणीसाठी आवश्यक कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. नागरिकांनी शांतता व शिस्त राखून निवडणूक प्रक्रियेस सहकार्य करावे, असे आवाहनही प्रशासनाने केले.

# पैठण नगरपरिषद निवडणुकीसाठी शहरातील विविध पक्षांकडून उमेदवारी अर्ज दाखल!

**आत्ताच एक्सप्रेस**

**पैठण/ प्रतिनिधी/** बबन उदावंत /आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पैठण शहरातील राजकीय वातावरण तापू लागले असून, विविध पक्षांकडून उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया वेगाने सुरू आहे. भारतीय जनता पक्षाच्या वतीने दि.१३ नोव्हेंबर रोजी प्रभाग क्रमांक ३ मधील दोन प्रमुख उमेदवारांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. प्रभाग क्रमांक ३-अ अनुसूचित जाती मधून आशा विश्वनाथ जगदाळे आणि प्रभाग क्रमांक ३-ब सर्वसाधारण मधून अनिल पांडुरंग पवार यांनी भाजपचे उमेदवार म्हणून आपली नामनिर्देशन पत्रे निवडणूक अधिकाऱ्यांकडे सुपूर्द केली.

अर्ज दाखल करण्यासाठी या दोन्ही उमेदवारांनी आपल्या समर्थकांसह पक्षाचे स्थानिक नेते, ज्येष्ठ पदाधिकारी आणि कार्यकर्ते सहभागी झाले होते. या उमेदवारी अर्जाच्या माध्यमातून भाजपने प्रभाग क्रमांक ३ मध्ये आपली ताकद दाखवून देत निवडणुकीचा श्रीगणेशा केला आहे.यावेळी उमेदवारांना पाठिंबा देण्यासाठी भाजपचे महत्त्वाचे स्थानिक नेते उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांमध्ये मोहिनी सुरज लोळगे, लक्ष्मण आवटे, डॉक्टर शांतीलाल राखा, बंडू आंधळे, विशाल पोहेकर, वैभव पोहेकर, सुरेश गायकवाड, अंबादास दहिवाळ, दिलीप बाबर, पप्पू गायकवाड, सुरज घुले, निखिल गुप्ता, अनिता पवार, शीला गायकवाड यांच्यासह भाजपचे अनेक स्थानिक पदाधिकारी आणि कार्यकर्ते सहभागी झाले होते.

या उपस्थितीमुळे भाजपच्या बाजूने प्रभाग ३ मध्ये सकारात्मक वातावरण निर्माण झाल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.याच बरोबर शहरातील अनेक अर्ज यावेळी दाखल झाले.१२क अशा प्रकारे निवडणुकीच्या रींगणात उतरत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

# मुक्त विद्यापीठाच्या लघुपटासह माती कलेला तृतीय पारितोषिक

**आत्ताच एक्सप्रेस**

**नाशिक (प्रतिनिधी) :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठास महाराष्ट्र राज्य युवक महोत्सव 'इंद्रधनुष्य २०२५' मध्ये तृतीय क्रमांकाची दोन पारितोषिके प्राप्त झाली आहेत. जळगाव येथील कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ येथे राज्यभरातील सर्व विद्यापीठांचा सहभाग असलेला हा युवक महोत्सव संपन्न झाला. त्यात ललित कला प्रकारातील माती कला स्पर्धेत चि. वैभव विष्णू गिराम (नांदेड) या विद्यार्थ्यांने तृतीय क्रमांक मिळवला. त्याचप्रमाणे विद्यापीठाच्या 'प्रतिबिंब' या लघुपटालाही तृतीय पारितोषिक जाहीर झाले.




या यशस्वी लघुपटाच्या निर्मितीमध्ये कु. दिपाली नितीन कलाल, चि. श्रेयश विजय इंगळे, चि. सौरभ सोमनाथ गायकवाड, चि. युनूस इस्माईल शेख, कु. भूमिका बाबाराव भालेराव, कु. सुप्रिया पंढरी गवते आणि कु. साक्षी मिलिंद गवळी या विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला होता. या महोत्सवात संघ व्यवस्थापक म्हणून श्री. सिध्दांत टाक यांनी काम बघितले.

विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे, प्र-कुलगुरू प्रा. जोगेंद्रसिंग बिसेन, विद्यापीठ व्यवस्थापन मंडळ सदस्य डॉ. संजीवनी महाले, कुलसचिव डॉ. गोविंद कतलाकुटे, विद्यार्थी कल्याण व बहिःशाल केंद्र प्रमुख डॉ. दयाराम पवार आणि सांस्कृतिक समन्वयक श्री. सचिन शिंदे यांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# आरएसएसवरील टीके धर्मावरील टीका मानता येणार नाही -.महेश धनावत

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना /प्रतिनिधी/** कर्नाटक उच्च न्यायालयाच्या एका महत्वपूर्ण निकालाने राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आरएसएस) आणि 'हिंदू' शब्दाच्या वापरावरून देशभरात कायदेशीर आणि सामाजिक वर्तुळात नवीन चर्चेला तोंड फोडले आहे. कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्या विरोधात दाखल करण्यात आलेली तक्रार फेटाळताना न्यायालयाने स्पष्ट केले की, आरएसएस 'हिंदू' शब्दाचा वापर धर्म म्हणून करत नाही आणि त्यामुळे संघटनेवरील टीकेमुळे धार्मिक भावना दुखावल्या जात नाहीत.ड. महेश धनावत यांचे कायदेशीर विश्लेषण या निकालावर प्रतिक्रिया देताना, नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष, ड. महेश एस. धनावत यांनी या निर्णयाचे कायदेशीर महत्त्व आणि मानहानी कायद्याच्या तरतुदींवर प्रकाश टाकला.ड. धनावत यांनी सांगितले की, कर्नाटक न्यायालयाचा हा निकाल भारतीय न्याय संहिता, २०२३ च्या कलम ३५६ (२) अंतर्गत मानहानीच्या गुन्ह्याच्या आवश्यक घटकांचे सविस्तर विश्लेषण करतो. या प्रकरणात, न्यायालयाने दोन मुख्य मुद्द्यांवर लक्ष केंद्रित केले: पहिला, आरोपीचा हेतु आणि दुसरा, पीडित व्यक्तीची ओळख.त्यांनी पुढे स्पष्ट केले की, भारतीय न्याय संहिता, २०२३ च्या कलम ३५६ नुसार, मानहानीचा गुन्हा सिद्ध करण्यासाठी, आरोपीने हेतुपुरस्सर आणि द्वेषपूर्ण भावनेने पीडित व्यक्तीच्या प्रतिष्ठेला हानी पोहोचवण्याच्या उद्देशाने विधान करणे आवश्यक आहे. या प्रकरणात, मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी विधानसभेत केलेल्या भाषणादरम्यान ही टिप्पणी केली होती, जी एका व्यापक चर्चेचा भाग होती. न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले की, त्यांचा हेतू कोणत्याही विशिष्ट व्यक्तीच्या किंवा गटाच्या प्रतिष्ठेला हानी पोहोचवण्याचा नव्हता, तर ते केवळ विधानसभेतील चर्चेदरम्यान आपल्या शासनाच्या कायदा आणि सुव्यवस्थेच्या कामगिरीवर बोलत होते.ड. धनावत यांनी पुढे सांगितले की, याचिकाकर्त्याने स्वतः आरएसएसच्या अधिकृत वेबसाइटवरून सादर केलेल्या माहितीतून हे स्पष्ट झाले की, संघटना 'हिंदू' शब्दाचा वापर धर्म म्हणून करत नाही. त्यामुळे, आरएसएसवरील टीकेला कोणत्याही धर्मावरील किंवा धार्मिक विश्वासांवरील टीका मानता येणार नाही. भारतीय न्याय संहितेच्या कलम २९९ नुसार, धार्मिक भावना दुखावण्याचा गुन्हा तेव्हाच सिद्ध होतो, जेव्हा हेतुपुरस्सर आणि द्वेषपूर्ण भावनेने कोणत्याही वर्गाच्या नागरिकांच्या धर्माचा किंवा धार्मिक विश्वासांचा अपमान केला जातो.निकालाचा सारांश आणि न्यायालयाची भूमिकाबंगळूरच्या अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी के.एन. शिवकुमार यांच्या न्यायालयाने हा निकाल दिला. वकील किरण एन. यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम २२३ अंतर्गत ही तक्रार दाखल केली होती. त्यांनी आरोप केला होता की, मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी आरएसएस आणि बजरंग दलाला राज्यातील गुन्हेगारीसाठी जबाबदार धरून त्यांच्या भावना दुखावल्या आहेत आणि आरएसएसची प्रतिमा मलिन केली आहे. न्यायालयाने आपली भूमिका स्पष्ट करताना म्हटले की, फिर्यादीच्या तक्रारीतील आरोप आणि त्यासोबत जोडलेली कागदपत्रे प्रथमदर्शनी कथित गुन्ह्यांची पूर्तता करत नाहीत. त्यामुळे, आरोपीविरुद्ध या गुन्ह्यांची दखल घेण्यासाठी कोणताही खटला तयार होत नाही. न्यायालयाने हे देखील स्पष्ट केले की, केवळ 'पीडित' व्यक्तीच मानहानीचा खटला दाखल करू शकते आणि या प्रकरणात, मुख्यमंत्र्यांनी याचिकाकर्त्याच्या विरोधात कोणतेही वैयक्तिक बदनामीकारक विधान केल्याचे दिसून येत नाही.एकंदरीत, या निकालाने मानहानी आणि धार्मिक भावना दुखावण्यासंबंधीच्या कायद्याच्या व्याप्तीवर महत्त्वपूर्ण प्रकाश टाकला आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट ॲण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813